# प्रबोधन
## गोरेगाव

## ३४ वा वार्षिक अहवाल
## २००५ - २००६



# प्रबोधन गोरेगाव


प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.
दूरध्वनी क्र. २८७९ ७५८०/२८७९ ७५८१.

www.prabodhan.org



संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No.Mum.46/72 GB BSD)
मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था
(Regn.No.F 2502 Mum.)
आयकर कलम ८०-ग खाली देणग्या करमुक्त



## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ
२००५-२००६

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. मनोहर अद्वानकर एम.एस्सी, पीएच.डी. |
| उपाध्यक्ष | : | ॲड्. विकास रेळे बी.ए., एल.एल.बी. |
| | | श्री. श्रीनिवास शिरसेकर जी.डी.आर्टस् |

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. मिलिंद इंबरे बी.कॉम. |
| प्रमुख कार्यवाह | : | श्री. समीर त्रैलोक्य बी.एस्सी. |
| सहकार्यवाह | : | श्री. सुनिल कविश्वर |
| | | श्री. रमेश इस्वलकर |
| खजिनदार | : | श्री. नितिन शिंदे बी.ए., डी.जे. |

## सभासद

श्री. चंद्रकांत देऊलकर
श्री. प्रसाद भायदे
श्री. अरविंद सावंत
श्री. शशांक कामत बी.कॉम.
श्री. विनोद निंबाळकर
श्री. गोविंद येतयेकर बी.कॉम.
श्री. प्रफुल्ल धामणकर
श्री. भूषण काळे

## सल्लागार समिती

श्री. वसंत तावडे
श्री. पांडुरंग पोखरकर
श्री. विलास देवरुखकर
श्री. सुरेश चव्हाण
श्री. गिरीश देसाई
श्री. महादेव खानोलकर

**अंतर्गत हिशेबतपासनीस**
श्री. विवेक जोशी बी.कॉम., एफ.सी.ए.

**सनदी लेखापाल**
श्री. जयंत आपटे बी.कॉम., एफ.सी.ए.

# प्रबोधन गोरेगाव

## ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १८ नोव्हेंबर २००६ रोजी रात्रौ ८.०० वा. प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामकाज :

१. प्रास्ताविक
२. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजुरी देणे.
३. २००५-२००६ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेबतपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.
४. संस्थेच्या कार्यात व्यापकता आणण्यासाठी घटनेत करावयाच्या दुरूस्ती संबंधी चर्चा आणि मंजुरी (सोबत सभासदाच्या माहितीसाठी प्रस्तावित दुरूस्तीचा तपशील जोडला आहे.)
५. नवीन वर्षाकरिता २००६-२००७ घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).
६. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेबतपासनीस व सरकारमान्य हिशेबतपासनीस यांची नेमणूक करणे.
७. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून,

दि. ३ नोव्हेंबर, २००६ — समीर त्रैलोक्य
गोरेगाव, मुंबई. — प्रमुख कार्यवाह

---

१. संस्थेचा जमाखर्च प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १० ते १२ नोव्हेंबर २००६ पर्यंत संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणत्याही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दि. १४ नोव्हेंबर, २००६ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.
२. गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.
३. निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १४ नोव्हेंबर, २००६ पर्यंत संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नुमना सोबत दिला आहे.

# प्रबोधन गोरेगाव

## कार्यकारिणीवरील सदस्य निवडणुकीची सूचना

१. निवडणुकीसाठी उभा राहाणारा उमेदवार, सूचक व अनुमोदक घटनेनुसार पात्र असले पाहिजेत.

२. खालील विहीत अर्जाच्या नमुन्यानुसार लेखी अर्ज दि. १४ नोव्हेंबर, २००६ पूर्वी कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.

३. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असतील तर त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात येईल व उरलेल्या जागांसाठी सभेस उपस्थित असलेल्या सभासदांमधून आवश्यक ठरल्यास उर्वरित जागांसाठी निवड करण्यात येईल.

४. निवृत्त होणारे सभासद निवडणुकीस उभे राहू शकतील.

५. उमेदवारास आपले नाव मागे घेण्याची अंतिम मुदत दि. १७ नोव्हेंबर, २००६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील.

६. उमेदवाराने निवडणुकीच्या वेळी सभेस उपस्थितीत राहाणे आवश्यक आहे.

---

## उमेदवारी अर्जाचा नमुना

(अर्ज स्वतंत्र कागदावर लिहिणे)

प्रमुख कार्यवाह

प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन गोरेगावच्या २००६–२००७ च्या अध्यक्षपदासाठी / उपाध्यक्षपदासाठी / कार्यकारिणी सदस्यत्वासाठी मी श्री./सौ./कु. ______________________ अर्ज करीत आहे.

सूचक सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________________ स्वाक्षरी :

सभासद क्र :

वरील सूचनेस माझे अनुमोदन आहे.

अनुमोदक सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________________ स्वाक्षरी :

सभासद क्र. :

वरील सूचनेस माझी संमती आहे.

उमेदवार सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________________ स्वाक्षरी :

पत्ता : ______________________

______________________

सभासद क्रमांक :

# प्रबोधन गोरेगाव

## ३४ वा वार्षिक अहवाल

(१ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६)

सन्माननीय सभासद,

प्रबोधन गोरेगाव या संस्थेच्या ३४ व्या वर्षाचा अहवाल संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारिणीच्या एकूण ८ सभा झाल्या. या सभांना समाधानकारक उपस्थिती होती. अहवाल वर्षअखेर प्रबोधन गोरेगावचे ७ आश्रयदाते, ४१९ आजीव सभासद तसेच प्रबोधन क्रीडाभवनाचे ४८५ दीर्घ मुदतीचे सभासद आहेत.

१९७२ रोजी क्रीडा व कलेची जोपासना, ज्ञानाचा प्रसार आणि समाजसेवा या त्रिसुत्रीचा आधार घेऊन प्रबोधन गोरेगाव संस्थेचे कार्यकर्ते कामाला लागले. केवळ निधी उभा करणे हा उद्देश न ठेवता समस्त गोरेगावकरांना आणि पश्चिम उपनगरवासीयांना लोकोपयोगी असे चांगले प्रकल्प, उपक्रम व कार्यक्रम देण्याचा संस्था सातत्याने यशस्वी प्रयत्न करीत आहे.

गेल्या ३४ वर्षात प्रबोधनने आखलेला प्रत्येक कार्यक्रम हा त्या त्या क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा ठरला. संस्थेचे काम गोरेगाव व मुंबई पुरते मर्यादित न ठेवता देशभर होण्यासाठी संस्थेने शास्त्रीय संगीतावर आधारित **'मुंबई फेस्टिव्हल'**, औषधी वनस्पतींना केंद्रबिंदू मानून आयोजित केलेले **'हर्बल वर्ल्ड'** हे प्रदर्शन या उपक्रमाचे भव्यदिव्य व यशस्वी आयोजन केले.

संस्था महत्त्वाची मानून प्रत्येक कार्यकर्त्याने स्वत:ला शिस्त लावून घेतली म्हणूनच प्रबोधनच्या इवल्याशा रोपट्याचा आज वटवृक्ष झाला. प्रबोधनने प्रत्येक नव्या गोष्टीचे स्वागत केले. कार्यक्रमा निमित्त संस्थेत येणाऱ्या प्रत्येक मान्यवराचा व कलाकारांचा योग्य सन्मान केला, त्यामुळेच गेल्या ३४ वर्षात प्रबोधनला उज्ज्वल परंपरा निर्माण करता आली. गोरेगावला साहित्य संस्कृतीचे माहेरघर करण्यासाठी प्रबोधनचे कार्यकर्ते तन-मन-धनाने झटले आहेत व यापुढेही झटणार आहेत. पश्चिम उपनगरातील एकमेव व अत्याधुनिक सोयीसुविधांनी परिपूर्ण अशी प्रबोधन गोरेगाव संचलित स्वर्गीय माँ साहेब मीनाताई ठाकरे सुसज्ज रक्तपेढी, ओझोन जलतरण तलाव आणि क्लब यासारखे अनेक उपक्रम हाती घेऊन संस्था यशस्वी वाटचाल करीत आहे.

संस्थेला आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देणारे देणगीदार आणि संस्थेस अनुदान देणाऱ्या संस्थांचा उपक्रमास लाभलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. स्थानिक लोकांचे सहकार्य, निष्ठावान व सेवाभावी कार्यकर्त्यांचे पाठबळ तसेच संस्थेच्या भरीव कामगिरीत वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेच्या सल्लागार समिती सदस्यांचे आम्ही आभारी आहोत.

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या ३४ व्या वर्षातील कार्याचा इतिवृत्तांत, ताळेबंद व जमाखर्च पत्रके आम्ही सन्माननीय सभासदांच्या माहितीसाठी सादर करीत आहोत.

लोभ आहेच तो अधिक वृद्धींगत व्हावा, हीच नम्र विनंती.

कार्यकारी मंडळ,
प्रबोधन गोरेगाव

# ३३ वा वर्धापन दिन

१९७२ साली गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर समाजसेवेचे व्रीद घेतलेल्या काही तरूणांनी एकत्र येऊन 'प्रबोधन गोरेगाव' हे छोटेसे रोपटे लावले. त्या रोपट्याचा पाहता – पाहता विशाल वटवृक्ष झाला. यामध्ये संस्थेच्या कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या स्थापनेपासूनच संस्थेवर मनापासून उत्कट प्रेम करणाऱ्या संस्थेच्या सभासदांचे बहुमोल सहकार्य संस्थेस लाभले आहे. अशा कार्यकर्त्यांसाठी व सभासदांसाठी संस्थेचा वर्धापन दिन सोहळा म्हणजेच घरगुती कौटुंबीक स्नेहसंमेलनच.

संस्थेचा ३३ वा वर्धापनदिन सोहळा प्रबोधन क्रीडाभवन येथे गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येस शुक्रवार दि. ८ एप्रिल २००५ रोजी संपन्न झाला. त्याप्रसंगी लोकप्रिय मराठी गीतांचा 'गन्धार' हा कार्यक्रम श्री. हेमंत बर्वे यांनी सादर केला. त्याप्रसंगी सन्माननीय सभासद व हितचिंतक आवर्जून उपस्थित होते. प्रथेप्रमाणे गोरेगावातील विद्यार्थ्यांचा व संस्थेच्या क्रीडाक्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा यथायोग्य सन्मान प्रबोधनचे संस्थापक व आमदार मा. श्री. सुभाष देसाई व मुंबई महानगरपालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष श्री. सुनिल प्रभु यांच्या शुभहस्ते केला गेला. त्याचप्रमाणे पार्श्वगायक श्री. सुदेश भोसले यांनी इंडियन आयडॉल श्री. अभिजीत सावंत, श्री. अमित साना, श्री. राहुल वैद्य या कलाकारांचा सत्कार केला.

इयत्ता दहावीमधून मराठी शाळेतून मुलींमध्ये सर्वप्रथम येण्याचा मान नंदादीप विद्यालयाच्या कु. प्रितम ब्रह्मदेव पाटील हिने पटकाविला. तिला ९१.३३% एवढे गुण प्राप्त झाले. तर मराठी शाळेतून मुलांमध्ये सर्वप्रथम येण्याचा मान विद्यामंदिरच्या गोरेगाव नाईट स्कूलमधील कु. समीर शशिकांत म्हात्रे याने पटकाविला. त्याला ३९.८६% एवढे गुण प्राप्त झाले.

शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेता व प्रबोधन गोरेगावचा मल्लखांबपटू मंगेश वायकूळ, गोरेगावच्या नवोदित गायिका श्रध्दा बांदोडकर, खोखो प्रशिक्षक संतोष परब, गुणवंत खेळाडू तुषार मोरे या गुणवंतांचाही श्री. सुभाष देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## ३४ वा वर्धापन दिन

संस्थेचा ३४ वा वर्धापनदिन सोहळा प्रबोधन क्रीडाभवन येथे गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येस बुधवार दि. २९ मार्च २००६ रोजी संपन्न झाला. त्याप्रसंगी लोकप्रिय मराठी गीतांचा 'आवाज चांदण्याचे' हा कार्यक्रम श्री. पराग माटेगावकर यांनी सादर केला. त्याप्रसंगी सन्माननीय सभासद व हितचिंतक आवर्जून उपस्थित होते. प्रथेप्रमाणे गोरेगावातील विद्यार्थ्यांचा व संस्थेच्या क्रीडाक्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा यथायोग्य सन्मान प्रबोधनचे संस्थापक व आमदार मा. श्री. सुभाष देसाई यांच्या शुभहस्ते केला गेला. याप्रसंगी गोरेगावातील प्रतिथयश बांधकाम व्यावसायिक श्री. शेखर दादरकर उपस्थित होते. इयत्ता दहावीमधून मराठी शाळेतून मुलांमध्ये सर्वप्रथम येण्याचा मान नंदादीप विद्यालयाच्या कु. अभिषेक मिलिंद पाटील याने पटकाविला. त्याला ९३.३३% एवढे गुण प्राप्त झाले. तर मराठी शाळेतून मुलींमध्ये सर्वप्रथम येण्याचा मान सन्मित्र मंडळ विद्यालयाच्या कु. मानस दिलीप मेजारी हिने पटकाविला. तिला ८९.२०% एवढे गुण प्राप्त झाले.

# हर्बल वर्ल्ड - २००५

जागतिक स्तरावर आयुर्वेदाला अन्यय साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. औषधी वनस्पतींची ओळख अधिक प्रमाणात होण्यासाठी तसेच भारतीय संस्कृतीच्या या अनमोल ठेवेचा प्रसार होण्यासाठी प्रबोधन गोरेगाव संस्थेने २००२ सालापासून हर्बल वर्ल्ड हे प्रदर्शन भरविण्यास सुरूवात केली. गेल्या तीनही वर्षी संस्थेला या प्रदर्शनास आयुर्वेदिक प्रेमी जनतेचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

सदर प्रदर्शनाच्या माध्यमातून संस्थेने नेहमीच आयुर्वेद व औषधी वनस्पतींची माहिती, त्यांचा उपयोग, दुर्मीळ दस्तावेज, संदर्भ ग्रंथ व इतर दालनातून या क्षेत्राशी निगडीत अशी माहिती जनतेसाठी प्रदर्शित केली.

यावर्षी हे प्रदर्शन दि. २२ ते २५ डिसेंबर, २००५ या कालावधीत गोरेगाव (पूर्व) येथील मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आले होते. चार दिवस चाललेल्या या प्रदर्शनात १५० औषधी वनस्पतींची कुंडीतील रोपे मांडण्यात आली होती. या औषधी वनस्पतींच्या दालनात मांडलेल्या प्रत्येक औषधी वनस्पतींच्या माहितीचे फलक सुध्दा प्रदर्शित करण्यात आले होते. त्याचबरोबर त्या क्षेत्रात काम करण्याऱ्या संस्था, व्यावसायिक व इतर संबंधित माहिती जनतेसाठी प्रदर्शित केली होती.

याच बरोबर पाच मुख्य दालनात औषधी वनस्पतीं क्षेत्राशी संबंधित माहिती, औषधे बनविण्याची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. तसेच ११२ व्यावसायिक या प्रदर्शनात सहभागी झाले होते. व्यावसायिक स्टॉलधारकात हिंदुस्थानातील आयुर्वेदिक व वनौषधी कंपन्या व संस्था सहभागी झाल्या. यात हिमालय, डाबर, लोटस हर्बल, झंडु, आयुर्वेदिक रसशाळा, चरक, हिंदुस्थान लिवर आदींचा समावेश होता.

या प्रदर्शनाचे उद्‌घाटन महापौर श्री. दत्ता दळवी यांच्या शुभ हस्ते झाले. त्यावेळी स्थायी समिती अध्यक्ष श्री. सुनिल प्रभु व या क्षेत्रातील मान्यवर, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ व वैद्य उपस्थित होते. प्रदर्शन कालावधीमध्ये प्रसिद्ध व्यावसायिक व अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या व संस्थेने आयोजित केलेल्या प्रदर्शनाची स्तुती केली.

या प्रदर्शनाच्या निमित्त संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व मुंबई नेचर हिस्ट्री सोसायटी यांच्या उद्यानात निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या निसर्ग सहलीस नामवंत वनस्पती तज्ज्ञ डॉ. सी. एस्. लट्टू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

हे प्रदर्शन यशस्वी करण्यास श्री. मार्शलीन रोझारियो अल्मेडा यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# मुंबई फेस्टिव्हल - २००६

हिंदुस्थानी अभिजात शास्त्रीय संगीतकला वाढविण्याचे काम महाराष्ट्राने केले. त्यात खासकरून मुंबईने मोठा वाटा उचलला. हिंवाळ्यात मुंबईत अनेक मान्यवर संस्थांतर्फे गेली अनेक वर्ष शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जातात. पश्चिम उपनगरातील संगीत रसिकांची आवड लक्षात घेऊन २000 सालापासून प्रबोधन गोरेगाव संस्थेने 'मुंबई फेस्टिव्हल' हे शीर्षक घेऊन संगीत महोत्सव आयोजित करण्यात सुरूवात केली.

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या आयोजन कौशल्यामुळे संस्थेने हाती घेतलेले प्रत्येक उपक्रम व कार्यक्रम आगळा-वेगळ्या स्वरूपात लोकांपुढे सादर करू शकलो. प्रत्येक कार्यक्रम नुसता यशस्वी न होता त्याची दखल त्या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी घेतली. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रात एक आगळा-वेगळा ठसा प्रबोधन गोरेगाव संस्थेने उमटविला.

सातत्याने सहा वर्षे होत असलेल्या या महोत्सवात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकरांनी आपली कला या महोत्सवात रसिकांपुढे सादर केली. यंदा हा महोत्सव गुरूशिष्य संकल्पनेवर आधारित होता व तो दि. २६, २७ व २८ जाने. २००६ या कालावधीत सादर करण्यात आला. गेल्या वर्षीप्रमाणेच यावर्षी सुद्धा शास्त्रीय संगीतातील दिग्गज कलाकारांना एकाच व्यासपीठावर पाहण्याची व ऐकण्याची दुर्लभ संधी उपलब्ध होऊ शकली.

*उस्ताद शाहिद परवेझ* यांच्या सतार वादनाने महोत्सवाची सुरूवात झाली व त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात *पंडीत हरिप्रसाद चौरासिया* यांच्या सुमधुर बासरी वादनाचा आनंद उपस्थितीत रसिकांनी घेतला.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी *श्रीमती शमा भाटे* यांच्या कथ्थक नृत्याचा कार्यक्रम झाला. तसेच *पंडित उल्हास कशाळकर* यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला.

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी *पंडित सुरेश तळवलकर* यांनी तबला वादनाचा कार्यक्रम सादर केला. *पंडित जसराज* यांचा शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात सहभागी कलाकरांनी सादर केलेल्या अवीट गोडीच्या बहारदार अदाकारीने रसिक मंत्रमुग्ध झाले. महोत्सवाचे सूत्रसंचालन *सौ. शिवानी जोशी* यांनी केले. हा महोत्सव आयोजित करण्यास *पंडित सुरेश तळवलकर* यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर महोत्सव 'सहारा इंडिया परिवार', 'एम.टी.एन.एल' यांनी पुरस्कृत केला होता तर माध्यम प्रायोजक म्हणून 'मुंबई टाइम्स' चे सहकार्य लाभले.

# स्वातंत्र्यवीर सावरकर उत्सव

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनकार्याची ओळख नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने त्यांच्या १२२ व्या जयंती निमित्त प्रबोधन गोरेगाव व सावरकर उत्सव समिती यांच्या विद्यमाने प्रबोधन क्रीडाभवनात २१ ते २९ मे दरम्यान नऊ दिवसांच्या सावरकर उत्सवाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. या उत्सवा दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेला हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रप्रेमी विचारांचे तुफान चेतविले. याप्रसंगी माजी लोकसभा अध्यक्ष व शिवसेना नेते मनोहर जोशी, अंदमान निकोबारचे नायब राज्यपाल राम कापसे, दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत, माजी केंद्रीय मंत्री राम नाईक, ज्येष्ठ पत्रकार मुजफ्फर हुसेन, शिवसेना नेते मधुकर सरपोतदार, उपमहापौर दिलीप पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.

सावरकर उत्सवाचे समारोपानिमित्त गोरेगावात भव्य स्मृती यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या स्मृती यात्रेत सावरकरांच्या जीवनावर आधारित २१ चित्ररथ सहभागी झाले होते. या उत्सवादरम्यान प्रा. सदा कऱ्हाडे लिखित 'सत्ता स्पर्धेचे राजकारण आणि सावरकर' या पुस्तकाचे प्रकाशन शिवसेनाप्रमुखांच्या शुभहस्ते झाले.

या उत्सवानिमित्त शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता एक वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पुणे येथील विकास पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी रेखाटलेली ५५५५ चौ. फूटाची महारांगोळी हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण होते. या महारांगोळीत स्वातंत्र्यवीर सावरकरांची तेजस्वी जीवनगाथा साकारण्यात आली होती. चित्रमय सावरकर या विषयावर शालेय विद्यार्थ्यांसाठी एक चित्रकला स्पर्धा तसेच सावरकरांच्या जीवनप्रवासाचे दर्शन घडविणारे छायाचित्र प्रदर्शन व सावरकरांनी लिहिलेल्या हिंदुत्वावरील क्रांतिकारी पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या उत्सवादरम्यान थोर संगीत दिग्दर्शक कै. सुधीर फडके निर्मित 'वीर सावरकर' हा चित्रपट दाखविण्यात आला. संगीत, नृत्य-नाट्यावर आधारित 'जयोस्तुते' हा खास कार्यक्रम तसेच सावरकरांच्या क्रांतिकारी आणि राष्ट्रभक्तीपर विचारांवर व्याख्याने आणि परिषदा त्याचप्रमाणे सावरकरांवरील पुस्तकांचे प्रकाशन आदी कार्यक्रमही या सावरकर उत्सवात साजरे करण्यात आले होते.

सावरकरांच्या जीवनातील काही निवडक प्रसंगाच्या आठवणी जीवंत करणारी 'सावरकर दर्शन' ही शोभायात्रा आणि लेझीम नृत्य तसेच ऐतिहासिक शस्त्रांचे भव्य प्रदर्शन सावरकर महोत्सवानिमित्त भरविण्यात आले होते.

ब्रिटीशांविरूध्द लढताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी वापरलेले दुर्मीळ पिस्तुल शिवसेना नेते श्री. सुभाष देसाई यांनी शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांना त्यांच्या मातोश्री निवासस्थानी दाखविले व सावरकरांच्या त्या दुर्मीळ पिस्तुलाची ऐतिहासिक माहिती कथन केली.

## एस्.एस्.सी. व्याख्यानमाला

सृजनशील बुद्धीला अनिर्बंध संचार करावयाला शिक्षण क्षेत्रात अनंत संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना घडविण्याचे सामर्थ्य तसेच गगनाला गवसणी घालण्याचा ध्येयवाद निर्माण करण्याचीही शक्ती फक्त शिक्षकात आहे. आजच्या संगणकीय युगात नेमक्या वेळात, नेमक्या पद्धतीने, नेमके लिहीले तरच विद्यार्थ्यांना शालान्त परीक्षेच्या गुणस्पर्धेत यशस्वी होण्यास मदत होईल. वर्षभराचा अभ्यास दोन ते तीन तासात शिकविणे हे काम शिक्षकच करू शकतो.

व्याख्यानमालेचे मार्गदर्शक शिक्षक, प्रबोधन संस्थेच्या प्रेमापोटी मुलांना मार्गदर्शन करण्याचे काम अतिशय आवडीने व उत्साहाने करतात. सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठी अरविंद गंडभीर विद्यालयाचे शिक्षक *श्री. एकनाथ कुंभार* यांचे मोलाचे सहकार्य गेली अनेक वर्षे लाभत आहे.

व्याख्यानमालेचे हे ३४ वे वर्ष असून ही व्याख्यानमाला दि. ३० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २००६ या कालावधीत प्रबोधन जॉर्गस पार्क येथे आयोजित करण्यात आली.

## प्रबोधन बालवाडी

समाजाच्या अविकसित घटकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम प्रबोधन यथाशक्ति आयोजित करीत असते. त्यापैकी एक उपक्रम म्हणजे प्रबोधन संस्थेतर्फे माफक शुल्कात जवाहर नगर, गोरेगाव (प.) व कोयना वसाहत, गोरेगाव (पू.) येथील झोपडपट्टीत बालवाड्या चालविण्यात येतात. या बालवाडीत जवळपास १०० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. *सौ. शालिनी वारीसे* यांचे या कार्यात मोलाचे सहकार्य लाभत आहे. या उपक्रमासाठी गेली अनेक वर्ष *सारस्वत बँकेचे* आर्थिक सहकार्य मिळत आहे. या मोलाच्या सहकार्याबद्दल संस्था बँकेची ऋणी आहे.

## प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन

प्रबोधन गोरेगाव संस्थेने यंदाही प्रबोधन क्रीडाभवनात हे दोन्ही महत्त्वाचे राष्ट्रीय सण साजरे केले. या दोन्ही दिवशी प्रबोधन गोरेगावच्या प्रांगणात ध्वजवंदन करण्यात आले.

# प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सव

पश्चिम उपनगरातील शालेय क्रीडा जीवनातील महत्त्वाचा असा प्रबोधन क्रीडामहोत्सव ज्याची शालेय खेळाडू डिसेंबर महिना जसजसा जवळ येत जातो तेव्हा आतुरतेने वाट पाहतात. असा हा क्रीडामहोत्सव दि. ७ ते ११ डिसेंबर, २००५ या दरम्यान प्रबोधन क्रीडाभवन येथे आयोजित करण्यात आला. यात १३० शाळांतील ५००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

२८ व्या प्रबोधन आंतर-शालेय क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन सोहळा दि. ७ डिसेंबर, २००५ रोजी सकाळी ८.०० वाजता पार पाडला. याप्रसंगी शिवसेना विभागप्रमुख *श्री. विनोद घोसाळकर* हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांना संचलन स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांनी मानवंदना दिली. याप्रसंगी प्रबोधन संस्थेच्या प्रेमापोटी संस्थेचे हितचिंतक व अनेक मान्यवर उपस्थितीत होते. *श्री. विनोद घोसाळकर* यांनी उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात संस्था अनेक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याबद्दल खास करून क्रीडाक्षेत्रासाठी करीत असलेल्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले.

क्रीडामहोत्सवाच्या समारोपापूर्वी झालेली लोकनृत्य स्पर्धा विशेष बहारदार झाली. सुमारे ३००० प्रेक्षकांच्या साक्षीने झालेल्या यास्पर्धेत विविध प्रकारची लोकनृत्ये शालेय विद्यार्थ्यांनी अत्यंत बहारदारपणे सादर केली.

सदर क्रीडामहोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि. ११ डिसेंबर, २००५ रोजी प्रबोधनचे अध्यक्ष डॉ. मनोहर अद्वानकर व विशेष अतिथी म्हणून श्री. रामाराव (प्रशिक्षक टेनिस ॲकॅडमी प्रबोधन) यांच्या हस्ते अत्यंत उत्साही व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडला. यावेळी विजेत्या संघांना फिरते चषक व कायम स्वरूपी स्मृतिचिन्ह तसेच प्रशिस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. क्रीडामहोत्सवातील सर्वोकृष्ट संघासाठी असणारा कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर, फिरता प्रबोधन चषक महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व) यांनी पटकाविला.

आयडियल क्लासेस, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, ग्रेटर बँक, देना बँक, कोको कोला, सारस्वत बँक यांनी सदर क्रीडामहोत्सव पुरस्कृत केला. या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे.

(सविस्तर निकाल परिशिष्ट अ मध्ये पाहावा)

# उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

प्रबोधन क्रीडाभवनच्या सर्व सुविधा १९९२ पासून सुरू झाल्या पासून मुंबईतील क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षक नियमित वर्गास प्रशिक्षण देऊ लागले. नियमित प्रशिक्षण वर्गाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन तसेच सुसज्ज व समतोल अशा क्रीडांगणाचा व क्रीडाभवनातील सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याच्या विचाराने संस्थेने उन्हाळी सुट्टीमध्ये वेगवेगळ्या कला व क्रीडा प्रकाराची शिबिरे भरविण्यास सुरूवात केली.

यंदाच्या १३ व्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, मल्लखांब, कराटे, ॲथलेटिक्स, चित्रकला अशा विविध कला, क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. यावर्षी हे शिबिर दि. १४ एप्रिल २००५ ते ३१ मे २००५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

गेल्या तीन वर्षापासून उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा एक भाग म्हणून ८ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींसाठी विनामूल्य बाल-योग प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी १३० विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले. त्यांना योग शिक्षिका *श्रीमती नीलिमा रेडकर* व *श्रीमती अंजली बुरांडे* यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.

शिबिरातील सर्व कला, क्रीडा प्रकारात एकूण १३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. क्रिकेट प्रशिक्षणाचे उद्घाटन माजी क्रिकेटपटू व मुंबई क्रिकेट संघटनेचे उपखजिनदार श्री. रवि सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व सहभागी शिबिरातील प्रशिक्षणार्थींना संस्थेतर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली. शिबिराच्या समारोपाच्या दिवशी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रात्यक्षिके उपस्थितांना करून दाखविली. समारोप सोहळ्यात प्रबोधन संस्थेच्या मल्लखांब, खो-खो व ॲथलेटिक्स या क्षेत्रातील वर्षभरात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना कै. भाऊ वराडकर स्मरणार्थ असलेल्या पारितोषिकांचे वितरण सिनियर क्रिकेटर्स सी.सी. संस्थेच्या प्रतिनिधींच्या हस्ते करण्यात आले.

# प्रोजेक्ट - २०००

प्रोजेक्ट २००० या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत एकूण ७ खेळाडूंना *श्री. रवी बागडी* यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात येते. या सर्व खेळाडूंना संस्थेतर्फे अल्पोपहार, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, खेळासाठी लागणारे साहित्य, सरावासाठी व स्पर्धेसाठी होणारा प्रवास खर्च या सर्व सोयी संस्थेतर्फे देण्यात येतात. या प्रकल्पांतर्गातील खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला व आपल्या खेळाची चमक दाखविली.

दिपाली इंगळे

★ गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ४ सुवर्ण, २ रौप्य व २ कांस्य पदक अशी एकूण ८ पदके पटाकाविली.

दिपाली डोयले

★ गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ७ सुवर्ण पदके पटकाविली.

चारूदत्त जांभेकर

★ गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ६ सुवर्ण, २ रौप्य, १ कांस्य अशी एकूण ९ पदके पटाकाविली.

मितेश उचिल

★ गेल्या वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये २ सुवर्ण, २ रौप्य, ४ कांस्य अशी एकूण ८ पदके पटाकाविली.

# ॲथलेटिक्स

'मुंबई उपनगर ॲथलेटिक्स संघटने' शी संलग्नता स्विकारून संस्थेने क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून 'ॲथलेटिक्स' चे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. ॲथलेटिक्स या क्रीडाप्रकारात प्रबोधन क्रीडाभवन, गोरेगाव तसेच पश्चिम उपनगरातील एकूण २० ते ३० खेळाडू *श्री. रवी बागडी* यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतात. संस्थेच्या खेळांडूनी गेल्या वर्षभरात झालेल्या जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होताना उल्लेखनीय कामगिरी केली.

## कराटे

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून गोरेगाव परिसरातील मुलांना संरक्षण व चपळता यासाठी उपयुक्त अशा क्रीडाप्रकाराचा लाभ घेता यावा, यासाठी संस्थेने 'जपान कराटे असोसिएन' शी संलग्नता व सहकार्याने कराटेचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. *श्री. सीताराम चव्हाण* व *श्री. विशाल सुर्वे* या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेल्या कराटेपटूंनी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करताना अनेक पारितोषिकेही जिंकली आहेत.

एकोणिसावी ऑल इंडिया कराटे फेडरेशन ची ऑल स्टाईल स्पर्धा तामिळनाडूच्या मेअर नायक राजन तर्फे २४ ते ३० एप्रिल, २००५ दरम्यान जवाहरलाल नेहरू इनडोर स्टेडीयम चेन्नई येथे आयोजित केली होती. या स्पर्धे मध्ये प्रबोधन गोरेगावची कराटे क्लास मधील विद्यार्थीनी दिव्या रेवणकर व कराटे प्रशिक्षक सिताराम चव्हाण यांनी महाराष्ट्र कराटे असोसियशन चे नेतृत्व केले. या स्पर्धेत दिव्या रेवणकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

१८ ते २१ वयोगट, ४८ ते ५३ वजनामध्ये दिव्या रेवणकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला व दिव्याची निवड मकाव येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये भारताचे नेतृत्व करण्यासाठी झाली.

जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करताना प्रबोधनच्या खेळाडूंनी एकूण ७८ पदके पटाकाविली. प्रबोधनचे प्रशिक्षक *श्री. सीताराम चव्हाण* हे आंतरराष्ट्रीय ४ थी डीग्री ब्लॅक बेल्ट परीक्षा पास झाले.

## टेबल टेनिस

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या टेबल टेनिस प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षक *श्री. राजेश आंगणे* यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज साधारणत: २० विद्यार्थी प्रशिक्षण घेतात. प्रबोधन येथे प्रशिक्षण घेत असलेल्या *जितेश पवार* व *मोहित राठोड* या दोन्ही खेळाडूंनी आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

## क्रिकेट

क्रिकेटचे प्रशिक्षण वर्षभर खेळाडूंना दिले जाते. या प्रशिक्षणाचा लाभ गोरेगाव तसेच पश्चिम उपनगरातील खेळाडू घेतात. दर वर्षी या खेळास वाढता प्रतिसाद लाभत आहे. सकाळ व दुपार या दोन वेळात प्रशिक्षण दिले जाते.

## खो-खो

मुंबई उपनगर जिल्हा खो-खो संघटनेच्या सहकार्याने संस्था खो-खो ह्या भारतीय खेळाच्या प्रसारासाठी गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. भारतीय खेळांच्या प्रसारासाठी संस्था सदैव अग्रेसर राहिली आहे.

## मल्लखांब / जिमनॅस्टिक्स

शरीराच्या सर्व अवयवांना कमीत कमी वेळात संपूर्ण व्यायाम देणारा मल्लखांब/जिमनॅस्टिक्स हा क्रीडाप्रकार आहे. धैर्य, ताकद, लवचिकता, कस, प्रसरणशिलता, वेग, दमछाक, सांघिक खेळांमधील संघभावना व परस्परानुभव या सर्व प्रकारच्या खेळांत आवश्यक असलेल्या कुवतीमध्ये मल्लखांबच्या नियमित सरावाने लक्षणीय वाढ होते. मदर डिसिप्लिन पायाभूत खेळ असे ही यास संबोधले जाते. या खेळाच्या विकासासाठी व प्रसारासाठी संस्था गेली १३ वर्षे कार्यरत आहे.

## प्रबोधन गोरेगाव संस्था खालील संस्थेशी संलग्न आहे.

- मुंबई उपनगर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना
- मुंबई उपनगर खो-खो संघटना
- मुंबई क्रिकेट संघटना
- मुंबई जिल्हा टेबल टेनिस संघटना
- महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना
- बृहन्मुंबई ॲम्युच्युअर जलतरण संघटना
- मुंबई उपनगर कबड्डी संघटना
- मुंबई जिल्हा मल्लखांब संघटना
- मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक संघटना
- जपान कराटे संघटना (भारत)
- नालंदा नृत्य संशोधन केंद्र

# प्रबोधन व्यासपीठ

प्रबोधन व्यासपीठ या उपक्रमा अंतर्गत गेल्या पाच वर्षात वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने आयोजित करताना संस्थेने सामाजिक कार्यातील आपले कर्तव्य पार पाडले, असे आम्हास वाटते. यावर्षी सुद्धा विविध क्षेत्रातील नामवंत, तज्ज्ञ मंडळींनी आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमांना रसिक श्रोत्यांची उपस्थिती नेहमीच उत्तम राहिली आहे. व्याख्याते व विषय यांची निवड करणे, तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लेखक व पत्रकार *श्री. शशी भालेकर* यांचे सातत्याने मौलिक सहकार्य लाभले आहे.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १६ एप्रिल ०५ | डॉ. शालिनी इनामदार<br>माजी प्राचार्य, एस.एन.डी.टी. | एअर हॉस्टेस व होम सायन्समधील करिअर |
| १९ जून ०५ | सौ. नयना वैद्य<br>सुप्रसिध्द व्याख्याती | कुरूक्षेत्र ते कारगील (भारतभूमीवरील युध्दाचा परामर्श) |
| १६ जुलै ०५ | डॉ. शेखर आंबर्डेकर | हृदयरोग निवारण |
| १३ ऑगस्ट ०५ | श्री. सुरेश आगाशे<br>सुप्रसिध्द व्याख्याते | ज्ञानेश्वरीचे जीवनातील स्थान |
| २४ सप्टेंबर ०५ | श्री. संजीव लाटकर<br>संपादक, दैनिक सकाळ | प्रसारमाध्यमे आणि आपण |
| १५ ऑक्टोबर ०५ | श्री. जयवंत छत्रे | मनाचे श्लोक आणि शाश्वत विचार |
| १९ नोव्हेंबर ०५ | डॉ.सौ विजया वाड<br>सुप्रसिध्द कथालेखिका | कथेची जन्मकथा |
| १७ डिसेंबर ०५ | डॉ. रामदास गुजराथी<br>माजी प्राचार्य, गोखले कॉलेज, बोरिवली | आत्मविश्वास वृध्दी |
| २१ जानेवारी ०६ | श्री. दा. कृ. सोमण<br>सुप्रसिध्द खगोलशास्त्रज्ञ | आकाशातील आश्चर्ये |
| १९ फेब्रुवारी ०६ | श्री. सुधाकर सहस्त्रबुध्दे | ज्योतिषशास्त्र एक मार्गदर्शन |
| ११ मार्च ०६ | श्री. विनायक कुलकर्णी | अर्थसंकल्प आणि गुंतवणूक |

# मुंबई २६ जुलै २००५ चा महापूर

आपल्या मुंबईमध्ये २६ जुलै २००५ रोजी प्रचंड पाऊस पडला, त्याचा परिणाम एवढा झाला की उपनगरातील जास्तीत जास्त परिसर पाण्याखाली गेला. कमीत कमी ५ ते ८ फूट पाणी साचले होते. जणू मुंबईमध्ये महापूरच आला होता. त्या दिवशी संस्थेतर्फे विविध शाळांमध्ये अडकलेल्या शालेय विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांची जेवणाची सोय करण्यात आली.

ज्या ठिकाणी पाणी साचले होते त्या परिसरातील प्रत्येक घरातील अन्नधान्यापासून शाळेचे कपडे, वह्या, पुस्तके सर्व नष्ट झाल्या. या सर्वांचा विचार करून संस्थेने त्वरित निर्णय घेऊन गोरेगाव परिसरातील पुरग्रस्तांसाठी जेवण पुरविण्यात आले. शाळेतील मुलांसाठी वह्या, दफ्तरे पेन, पेन्सिल यांचे वाटप केले. महाराष्ट्र राज्य व पाठ्यपुस्तक मंडळाशी सपंर्क साधून शालेय पुस्तकांचीही व्यवस्था करण्यात आली.

# ऋणनिर्देश

संस्थेच्या गत वर्षाच्या वाटचालीत अनेक मान्यवर व्यक्ती, संस्था, पत्रकार, क्रीडासमीक्षक त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदांचे व अनेक कार्यकर्त्यांचे सतत सक्रीय व आर्थिक पाठबळ लाभले. त्याचप्रमाणे त्यांचा संस्थेवरील लोभ सतत वृद्धिंगतच होत गेला, त्यांच्या सहकार्यामुळेच आज संस्थेने यशस्वीरित्या विविध उपक्रमांमध्ये वाटचाल केली. सेवाभावीवृत्तीने काम करणाऱ्या संस्थेच्या सेवक वर्गाचेही आजवरच्या सक्रीय वाटचालीत महत्त्वाचे योगदान आहे.

संस्थेस सतत आर्थिक पाठबळ देणारे देणगीदार, दानशूर व्यक्ती व संस्था त्याचप्रमाणे गोरेगावचे आमदार, नगरसेवक या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. त्या सर्वांबरोबरचे ऋणानुबंध व प्रेम सतत वृद्धिंगतच होत राहील, याचा आम्हास मनापासून विश्वास वाटतो.

कार्यकारी मंडळ
प्रबोधन गोरेगाव

# २८ व्या क्रीडामहोत्सवाचा निकाल (परिशिष्ट - अ)

**प्रबोधन मानचिन्ह (सर्वोत्कृष्ट संघ) :**
मानचिन्ह पुरस्कर्ते - श्री. सुरेश वासुदेव सैतवडेकर
कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर प्रबोधन स्मृतिचिन्ह,
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे (पूर्व).

**अॅथलेटिक्स स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर
कै. शशिकला सखाराम निंबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : गोकुळधाम हायस्कूल, गोरेगाव (पूर्व).

**अॅथलेटिक्स स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एस.एन.बाळकृष्ण
कै.एस.एन.सुब्रमणियन् स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : सेंट लॉरेन्स हायस्कूल, आशानगर, कांदिवली (पूर्व)

**कबड्डी मुले विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश टिंबर मार्ट
कै. आसाराम गायकवाड स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : छत्रपती शिवाजी विद्यालय, विलेपार्ले (पूर्व)

**कबड्डी मुले उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश एक्सपोर्ट, गोरेगाव.
शाळा : नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)

**कबड्डी मुली विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स जे.बी.सावंत इंजिनिअरिंग प्रा.लि.
शाळा : नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)

**कबड्डी मुली उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश प्लास्टिक वर्क्स
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, बांद्रा (पूर्व)

**टेनिस स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.व सौ. रामाराव
कै. त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : हंसराज मोरारजी पब्लिक स्कूल, अंधेरी (प.)

**टेनिस स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. व सौ. रामाराव
कै. त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : श्रीमती सावित्री वसंत हायस्कूल, जुहू
डॉ. एस. राधाकृष्णनन विद्यालय, मालाड (प.)

**खो-खो मुले विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : आर.एस.जंगम
शाळा : सुविद्यालय, बोरिवली (प.)

**खो-खो मुले उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै. तुलसीदास खिमजी स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव (प.)

**खो-खो मुली विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै..एन.बी.पाटील,
कै. मंदार पाटील स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : परांजपे विद्यालय, अंधेरी.

**खो-खो मुली उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : सौ. आशा प्रभाकर ठाकूर
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व).

**संचलन स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै. एन.बी.पाटील
कै. बाळकृष्ण पाटील स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : मेरी इमॅक्युलेट गर्ल्स हायस्कूल, बोरिवली (प.)

**संचलन स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गोरेगाव स्पोर्टस् क्लब
शाळा : सेंट अॅनेक्स हायस्कूल, बोरिवली (प.)

**लोकनृत्य स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स हॉटेल प्रकाश, गोरेगाव
शाळा : चिल्ड्रन्स अॅकेडमी, अशोकनगर, कांदिवली.

**लोकनृत्य स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आशीर्वाद स्टोर्स, गोरेगाव
शाळा : चिल्ड्रन्स अॅकेडमी, मालाड

**मल्लखांब स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर
कै. सखाराम निंबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ,
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे (पूर्व).

**मल्लखांब स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.. नितीन शिंदे,
कै. डॉ. अनंतराव शिंदे स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : संस्कारधाम विद्यालय, (कर्णबधीर), गोरेगाव (प.)

**उत्कृष्ट अॅथलेटिक्स (मुलगी)**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आयडियल क्लासेस प्रा. लि.
श्वेता विश्वकर्मा, शाळा : सेंट लॉरेन्स हायस्कूल, आशानगर, कांदिवली

**उत्कृष्ट अॅथलेटिक्स (मुलगा)**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आयडियल क्लासेस प्रा.लि.
१) वरूण सावे, शाळा : रूस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर
२) तुषार पुजारी शाळा : सेंट लॉरेन्स हायस्कूल, बोरिवली (प.)

जलतरण स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. नितीन शिंदे
सौ. विजयालक्ष्मी अनंतराव शिंदे स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : यशोधाम हायस्कूल, गोरेगाव (पूर्व).

जलतरण स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर
कै. शशिकला सखाराम निंबाळकर स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : आर्य विद्यामंदिर, सांताक्रूझ.

## प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

(२००५ - २००६)

### एकूण पुस्तके - ७८३४

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी – | ४८०० | इंग्रजी – | ८४१ |
| हिंदी – | ३३२ | संदर्भ ग्रंथ – | ४१९ |

एकूण पुस्तके - ७८३४

**मासिके –**

इंग्रजी – सोसायटी, सॅवि, स्टारडस्ट, फिल्मफेअर, न्यु वुमन, हेल्थ
मराठी – चारचौघी, गृहशोभिका, ललित, अनुभव, माहेर, स्त्री, किर्लोस्कर, मैत्रिण, मिळून साऱ्याजणी, भटकंती, गृहलक्ष्मी, मानिनी, प्रपंच,
हिंदी – गृहशोभा, मेरी सहेली, गृहलक्ष्मी, वनिता, नवनीत.

एकूण – २४

**पाक्षिके**

इंग्रजी – वुमन्स ईरा, फेमिना
मराठी – जनप्रवाह, श्री तशी सौ
हिंदी – सरिता

एकूण – ५

**साप्ताहिक**

मराठी – चित्रलेखा, लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ, मार्मिक
इंग्रजी – आऊट लुक, द विक, इंडिया टूडे

एकूण – ७

**वर्तमानपत्रे**

मराठी – सामना, महाराष्ट्र टाईम्स, नवाकाळ
इंग्रजी – टाईम्स ऑफ इंडिया

एकूण – ४

**बालविभाग**

| | | |
|---|---|---|
| मराठी | – | ५७३ |
| इंग्रजी | – | ७२२ |
| हिंदी | – | १४७ |
| एकूण पुस्तके | – | १४४२ |

खरेदी केलेले ग्रंथ – ५५

भेट आलेले ग्रंथ – १५

३१ मार्च २००५ अखेरीस एकूण सभासद – ८०१

३१ मार्च २००६ अखेरीस एकूण सभासद – ९९६

**नवीन सभासद**

| | | |
|---|---|---|
| पुस्तक विभाग | – | ९१ |
| मासिक विभाग | – | ४० |
| बालवाचनालय विभाग | – | ६४ |
| एकूण | | १९५ |

**रद्द सभासद**

| | | |
|---|---|---|
| पुस्तक विभाग | – | ५६ |
| मासिक विभाग | – | ७ |
| बालवाचनालय विभाग | – | १८ |
| एकूण | | ८१ |

# 'प्रबोधन गोरेगाव' - घटना दुरूस्ती

| अ. क्र. | घटना कलम / नियम क्र. सध्या अस्तित्वात असणारे / असणारा | सुचविण्यात आलेली घटना / नियम दुरूस्ती | घटना दुरूस्ती नंतर बदल झालेले घटनेचे कलम / नियम | घटना दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | घटना कलम क्र. ३<br>धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषतः आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांची त्याचप्रमाणे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सांस्कृतिक, शारीरिक, शैक्षणिक व बौध्दिक प्रगती साधणे यासाठी. | घटना कलम क्र. ३<br>धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणा-पासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषतः आर्थिक दृष्ट्या दुर्बल, गरजू, होतकरू शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आर्थिक मदत उपलब्ध करून देणे. | घटना कलम क्र. ३<br>क) धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणा-पासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषतः आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांची त्याचप्रमाणे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सांस्कृतिक, शारीरिक, शैक्षणिक व बौध्दिक प्रगती साधणे यासाठी तसेच धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणा-पासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषतः आर्थिक दृष्ट्या दुर्बल, गरजू, होतकरू शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आर्थिक मदत उपलब्ध करून देणे. | उद्देशांना व्यापक स्वरूप देण्यासाठी |

| अ. क्र. | घटना कलम / नियम क्र. सध्या अस्तित्वात असणारे / असणारा | सुचविण्यात आलेली घटना / नियम दुरूस्ती | घटना दुरूस्ती नंतर बदल झालेले घटनेचे कलम / नियम | घटना दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| २ | घटना कलम क्र. ३<br>धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषत: आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांची त्याचप्रमाणे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सांस्कृतिक, शारीरिक, शैक्षणिक व बौध्दिक प्रगती साधणे यासाठी. | धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषत: आर्थिक दृष्टया दुर्बल व्यक्तींना शस्त्रक्रिया अथवा औषधोपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे. | ख) धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणा-पासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषत: आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांची त्याचप्रमाणे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सांस्कृतिक, शारीरिक, शैक्षणिक व बौध्दिक प्रगती साधणे यासाठी. धर्म, पंथ, भाषा अगर जात या आधारावर पक्षपात न करता राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त राहून समाजातील सर्व थरातील लोकांची व विशेषत: आर्थिक दृष्टया दुर्बल व्यक्तींना शस्त्रक्रिया अथवा औषधोपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे. | उद्देशांना व्यापक स्वरूप देण्यासाठी |

## आवाहन

प्रबोधन गोरेगाव संस्थेने सुरू केलेल्या रक्तपेढीस आर्थिक सहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. आपणास नम्र विनंती आहे की, आपण संस्थेचे हितचिंतक या नात्याने या स्तुत्य उपक्रमासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत देऊन संस्थेच्या या सेवाभावी व सामाजिक कार्यास आपलाही हातभार लावावा. रूपये २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदारांच्या नावांचा उल्लेख प्रबोधन रक्तपेढीच्या फलकावर कायमस्वरूपी लावण्यात येईल.

**आपण दिलेली देणगी (८० ग) नियमानुसार करमुक्त आहे.**

# २००५ - २००६ सालातील विविध कार्यक्रम / उपक्रम



क्रीडा महोत्सव २००५ मल्लखांब



वर्धापन दिन २००५



क्रीडा महोत्सव २००५ लॉन टेनिस स्पर्धा




क्रीडा महोत्सव २००५ जलतरण स्पर्धा



उन्हाळी प्रशिक्षण शिबिर २००५

# २००५ - २००६ सालातील विविध कार्यक्रम / उपक्रम



स्वातंत्र्यवीर सावरकर उत्सव



२५ डिसेंबर २००५ नाताळ




मुबंई फेस्टिवल २००६




हर्बल वर्ल्ड २००५




मे बॉल २००५ ओझोन क्लब

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम

# प्रबोधन
गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,
गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ दूरध्वनी : २८७९ ७५ ८०/८१
www.prabodhan.org

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेले

**प्रबोधन क्रीडाभवन**

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलामध्ये क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, खो-खो, कराटे व नृत्य यांचे तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थसेंटर

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

**प्रबोधन जॉगर्स पार्क**

टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली टेनिस ॲकॅडमी आणि सभोवताली सुंदर वनराई असलेला जॉगिंग ट्रॅक

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

**प्रबोधनकार ठाकरे वाचनालय**

प्रत्येक घरासाठी, घरातील प्रत्येकासाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी ज्ञान-मनोरंजनाचा मेवा

प्रबोधन जॉगर्स पार्क : सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७, गोरेगाव (प.),
मुंबई - ४०० ०६२. दूरध्वनी : २८७५ ७५ ८८.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेली

**माँ साहेब सौ. मीनाताई ठाकरे प्रबोधन रक्तपेढी**

२४ तास कार्यरत असलेल्या या रक्तपेढीत अल्पदरात रक्त व रक्तघटक उपलब्ध.
सिद्धार्थ रुग्णालय, गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४. दूरध्वनी क्र. २८७२ २१ २९ / २८७९ ७५ ८६/८७.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेला

ओझोन

**ओझोन जलतरण तलाव**

'ओझोन' प्रक्रियेचा वापर केलेल्या जलतरण तलावात
तज्ज्ञांकडून पोहण्याचे प्रशिक्षण माफक दरात उपलब्ध.
निरलॉन ऑलिम्पिक जलतरण तलाव, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.
दूरध्वनी क्र. २८७९ ७५ ८२/८३